Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

राज्यात मतदारयाद्यांमध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिम
(पान २ वर)



Selected

आमदार, खासदारांना सन्मानाची वागणूक द्या

मुंबई : आमदार, खासदार लोकप्रतिनिधींशी सुसंवाद राखण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून होत नसल्याने विधानसभा विशेषाधिकार समितीने प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याची दखल घेत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी स्पष्ट आदेश देताना आमदार, खासदारांना सन्मानाची वागणूक देण्याचे आदेश दिले आहेत. आमदार, खासदारांना सन्मानाची वागणूक देण्यासंदर्भात २०२५ पासून दोनदा राज्य सरकारकडून निर्देश देण्यात आले नाराजी लोकप्रतिनिधींकडून नोंदविण्यात आल्यानंतर विधानसभा विशेषाधिकार समितीने याविषयी प्रशासनाला सूचना दिल्या. या सूचनांनुसार मुख्य सचिवांकडून सर्व प्रशासकीय विभागांना याविषयीच्या आदेशांची अंमलबाजवणी करण्याचे परिपत्रक जारी करण्यात आले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे कार्यकर्ते व जनतेला आवाहन; अजित पवारांच्या आठवणीने भावुक

दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीत मदत करा!

पुष्पगुच्छांवरील खर्च मदत निधीकडे वळवण्याचे सुनेत्रा पवारांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

बारामती । महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सामाजिक बांधिलकीचे आवाहन केले आहे. सत्कारासाठी पुष्पगुच्छ देण्याऐवजी दुष्काळग्रस्त शेतकरी आणि नागरिकांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्ते तसेच जनतेला केले.

राज्यात यंदा पावसाच्या अनियमिततेचा परिणाम शेतीवर झाला आहे. जुलैच्या सुरुवातीला अनेक भागांत जोरदार पाऊस झाल्याने परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतर पावसाने मोठी उघडीप दिली. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये काही ठिकाणी पाऊस झाला असला तरी अनेक भागांत पिकांच्या गरजेच्या काळात पुरेसा पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या. अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून विविध भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यात येत आहे. संकटग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देण्याची गरज असताना सत्काराच्या पारंपरिक पद्धतीऐवजी मदतीला प्राधान्य देण्याचा संदेश सुनेत्रा पवार यांनी दिला. बारामती सहकारी बँकेच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत



सोमवारी सुनेत्रा पवार बोलत होत्या. राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या सभेला त्या प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीत मदत करण्याचे आवाहन केले. "सत्कारासाठी पुष्पगुच्छ देण्याऐवजी मुख्यमंत्री सहायता निधीत मदत करा," असा संदेश त्यांनी दिला. या आवाहनातून सध्याच्या संकटाच्या काळात सामाजिक संवेदनशीलता आणि मदतीची भावना जपण्यावर त्यांनी भर दिला. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला सुनेत्रा पवार यांची ही पहिलीच उपस्थिती होती. यावेळी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना त्या भावुक झाल्या. "अनेक वर्षांपासून सगळे म्हणायचे, वहिनी तुम्ही अजितदादांसोबत वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर राहायला हवे. मात्र, अशा सभेला मला एकट्याने यावे लागेल, असे कधी वाटले नव्हते. अजितदादांची सर कधीच कोणाला येणार नाही," असे सांगताना सुनेत्रा पवार यांच्या डोळ्यांत अश्रू आले. बारामती आणि अजित पवार यांचे नाते अत्यंत घट्ट असल्याचे सांगत दादांशिवाय अनेक गोष्टी अपूर्ण वाटत असल्याचेही त्यांनी नमूद केले. गेल्या पाच वर्षांत अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती सहकारी बँकेने उल्लेखनीय काम केले असून, बँकेने ३८.८५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवल्याचे त्यांनी सांगितले.राज्यात यंदा पावसाच्या अनियमिततेचा परिणाम शेतीवर झाला आहे. जुलैच्या सुरुवातीला अनेक भागांत जोरदार पाऊस झाल्याने परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती.

बारामती सहकारी बँकेच्या सभेत आवाहन

दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी बारामती नगरपरिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या गरुड बागेतील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. परिसरातील विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी कामांची सद्यस्थिती जाणून घेतली. नागरिकांसाठी आवश्यक सुविधा, परिसराचे सुशोभीकरण, कामांचा दर्जा आणि कामांची गती याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांनी माहिती घेतली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुष्पगुच्छांऐवजी मदतीचा हात पुढे करण्याचे सुनेत्रा पवार यांचे आवाहन सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. औपचारिक सत्कारावरील खर्च गरजूंसाठी उपयोगी पडावा, हा या आवाहनामागील मुख्य संदेश आहे.

सप्टेंबरअखेर पावसाची महाराष्ट्राकडे पाठ; राज्यातील पाऊसतूट १८ टक्क्यांवर!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: यंदाच्या मान्सूनच्या अखेरच्या टप्प्यातही महाराष्ट्राच्या वाट्याला अपेक्षित पाऊस न आल्याने राज्यातील पाऊसतुटीचा आलेख पुन्हा चढताना दिसत आहे. २८ सप्टेंबरअखेर राज्यातील एकूण पाऊसतूट तब्बल १८ टक्क्यांवर पोहोचली आहे. ऑगस्टअखेरीस हीच तूट १२ टक्के होती. सप्टेंबरमध्ये अपेक्षित पावसाने पाठ फिरवल्याने अवघ्या काही आठवड्यांत पाऊसतुटीत वाढ झाली आहे. सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे देशातील काही भागांत मान्सून पुन्हा सक्रिय झाला. विदर्भातील काही तुरळक ठिकाणीही पावसाची नोंद झाली. मात्र, या प्रणालीचा महाराष्ट्रातील एकूण पावसाच्या तुटीवर फारसा सकारात्मक परिणाम झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झालेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. ऑगस्टअखेरीस १२ टक्के तूट ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसामुळे ३१ ऑगस्टअखेर महाराष्ट्रातील पाऊसतूट १२ टक्क्यांवर होती. त्यानंतर पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने सप्टेंबरच्या मध्यापर्यंत ही तूट १६ टक्क्यांवर गेली. आता २८ सप्टेंबरच्या आकडेवारीनुसार राज्यातील तूट १८ टक्क्यांवर पोहोचल्याचे चित्र आहे. ३० सप्टेंबरनंतर मान्सूनचा अधिकृत हंगाम संपतो. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये पाऊस झाला तरी मान्सूनच्या हंगामातील पाऊसमान मोजताना १ जून ते ३० सप्टेंबर हा कालावधी ग्राह्य धरला जातो. परिणामी, सप्टेंबरअखेरची पाऊसतूट खरीप हंगामाच्या एकूण परिस्थितीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे. देशात मात्र पाऊसस्थितीत काहीशी सुधारणा



महाराष्ट्राच्या तुलनेत देशातील एकूण पाऊसतुटीत काहीशी घट झाली आहे. ३१ ऑगस्टअखेर देशातील पाऊसतूट १४ टक्के होती. २८ सप्टेंबरपर्यंत ती १२ टक्क्यांवर आली आहे. बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणालीचा पूर्व आणि ईशान्य भारत तसेच वायव्य भारतातील काही राज्यांना फायदा झाला. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने संबंधित विभागांच्या एकूण पावसाच्या आकडेवारीत सुधारणा झाली. उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस उत्तर प्रदेशात २८ सप्टेंबरपर्यंत सरासरीपेक्षा सुमारे ८ टक्के अधिक पाऊस नोंदवला गेला, तर उत्तराखंडमध्ये सरासरीपेक्षा ९ टक्के अधिक पाऊस झाल्याचे आकडेवारीतून दिसते. त्यामुळे या भागांना बंगालच्या उपसागरातील प्रणालीचा तुलनेने चांगला फायदा झाल्याचे चित्र आहे. पूर्व आणि ईशान्य भारतातील पाऊसस्थितीतही काहीशी सुधारणा झाली आहे. ३१ ऑगस्टअखेर या विभागात २६ टक्के तूट होती. २२ सप्टेंबरपर्यंत ती २७ टक्क्यांवर गेली होती; मात्र २८ सप्टेंबरपर्यंत ती २५ टक्क्यांवर आली. वायव्य भारतातील तूटही ११ टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत राज्यातील पाऊसतूट आणि पिकांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत आणि दुष्काळी उपाययोजनांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आल्याचा मुद्दा पुढे करत विविध मागण्या सरकारसमोर मांडल्या जात आहेत. विशेषतः केळी उत्पादकांसह पावसाअभावी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीची मागणी केली जात आहे. 'मागण्या मान्य झाल्या नाहीत तर रस्त्यावर उतरू' दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनीही सरकारला आंदोलनाचा इशारा दिला आहे. सरकारकडून अपेक्षित असलेल्या उपाययोजनांचे निवेदन देण्यात आले असून, दोन-चार दिवसांत सरकारकडे त्यासाठी आग्रह करण्यात येईल. मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची भूमिका घेतली जाईल, असे पवार यांनी सोमवारी सांगितले.

नरहरी झिरवाळ आणि संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा घेराव

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: नाशिकमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. नाशिक जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत राडा झाल्याची माहिती मिळत आहे. या सभेत आपल्या मुद्द्यांवर चर्चा न झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या सभेत शेतकरी प्रचंड आक्रमक झाले. शेतकऱ्यांकडून सभेतच अभूतपूर्व गोंधळ घालण्यात आला. शेतकरी इतके आक्रमक झाले होते की, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा सभेतच घेराव घातला. तसेच त्यांना धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याची देखील माहिती समोर येत आहे. सभेत झालेला गदारोळ पाहता पोलिसांनी मध्यस्थी केली. पोलिसांच्या बंदोबस्तात नरहरी झिरवाळ यांना सभेतून बाहेर काढण्यात आलं. यानंतर शेतकऱ्यांनी प्रशासक संतोष बिडवई यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही शेतकऱ्यांनी बिडवाई यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न केल्याचा दावा केला जातोय.

तणावाची परिस्थिती पाहता मंत्री नरहरी झिरवाळ आणि प्रशासन संतोष बिडवई यांनी तिथूना काढता पाय घेतला. 'बाप म्हातारा झालाय, पण अजूनही हातात जादू आहे'; मराठी शेतकऱ्याने ऑस्ट्रेलियाची जमीन मुलासाठी केली



हिरवीगार, बागेचा व्हिडीओ व्हायरल भुकेल्या पिल्लासाठी आईनं अख्खं झाड हलवलं, फळांचा पाऊस पाहून पिल्लू लागलं नाचू, हत्तीणीचा व्हिडीओ पाहून तुम्हीही व्हाल भावुक Iran ने US चे Reemus 600 drone केले जप्त, Indian ocean पर्यंत संघर्ष वाढवण्याचे IRGC चे संकेत नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत जोरदार गोंधळ घातला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी राष्ट्रगीत म्हणत सभा गुंडाळण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी सभेतच आक्रमक पवित्रा घेतला. या प्रकारामुळे सभास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांची भूमिका काय? निफाड साखर कारखान्यातील कथित घोटाळ्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली होती. मात्र, या विषयावर चर्चा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले. विविध प्रश्न मांडल्यानंतरही त्यावर चर्चा न करता सभा गुंडाळली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. राष्ट्रगीत सुरू झाल्यानंतरही शेतकऱ्यांनी आपला आक्षेप नोंदवत घोषणाबाजी केली. झिरवाळ आणि बिडवई यांना घेराव दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि बँकेचे प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांनी सभेतच घेराव घातला. यावेळी दोघांनाही धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात आले.

रोजगार मेळाव्याला आचारसंहितेचा फटका

मुंबई : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभरात २९ सप्टेंबरला एकाच दिवशी पाचशेहून अधिक रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आले आहेत. रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने ३० शैक्षणिक संस्थांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. या माध्यमातून बेरोजगारांना हजारो रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार होत्या. मात्र, शिक्षक व पदवीधर निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे या रोजगार मेळाव्यांवर गदा आली आहे.

सप्टेंबरमध्येच 'ऑक्टोबर हीट'चा चटका!

जन सम्राट टाईम्स



नाशिक | प्रतिनिधी: पावसाळ्याचा हंगाम सुरू झाला तेव्हापासून सुरू असलेला पावसाचा लहरीपणा अखेरच्या टप्प्यातही कायम आहे. सप्टेंबरमध्ये पाऊस गायब झाला असून, जिल्ह्यात या महिन्यात पावसाची तब्बल ७० टक्के तूट नोंदविली गेली आहे. श्री गणेश चतुर्थीच्या पुर्वसंध्येला म्हणजेच १३ सप्टेंबरला कमाल तापमान २५.३ अंश सेल्सियस नोंदविले गेले होते, ते ३२ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले आहे. म्हणजेच १५ दिवसांत कमाल तापमानात सात अंश सेल्सियसपर्यंत वाढ झाली आहे. परिणामी नाशिककरांना सप्टेंबरमध्येच ऑक्टोबर हीटचा प्रत्यय येतो आहे. जून ते सप्टेंबर असा पावसाचा चार महिन्यांचा हंगाम असतो. पावसाने जूनच्या सुरुवातीला नाशिककरांकडे पाठ फिरवली. त्यामुळे जूनमध्ये पाऊस सरासरी गाठू शकला नाही. जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये सरासरी गाठणारा पाऊस सप्टेंबरमध्ये गायब झाला आहे. म्हणजेच सरासरीच्या केवळ ३०.४ टक्के पाऊस पडला असून, तब्बल ६९.६ टक्के तूट नोंदविली जाणे चिंताजनक आहे. पुढील तीन - चार दिवस पावसाची चिन्हे नसल्याने सप्टेंबर महिना बऱ्यापैकी कोरडा जाण्याचे संकेत मिळत आहेत.

एकीकडे परतीच्या पावसाने नाशिककरांकडे पाठ फिरवली असून, दुसरीकडे उन्हाचा तडाखा ही वाढत चालला आहे. त्यामुळे सप्टेंबरमध्ये नाशिककरांना ऑक्टोबर हीटसारख्या झळांचा सामना करावा लागतो आहे. या महिन्यात कमाल तापमान ३२ अंश सेल्सियपर्यंत पोहचले आहे. १५ दिवसांपैकी आठवडाभर कमाल तापमान ३० अंश सेल्सियसपेक्षा अधिक नोंदविले गेले. तापमानात सातत्याने होणारे चढ उतार आरोग्याच्या तक्रारींनाही कारणीभूत ठरत आहेत.पावसाळ्याचा हंगाम सुरू झाला तेव्हापासून सुरू असलेला पावसाचा लहरीपणा अखेरच्या टप्प्यातही कायम आहे. सप्टेंबरमध्ये पाऊस गायब झाला असून, जिल्ह्यात या महिन्यात पावसाची तब्बल ७० टक्के तूट नोंदविली गेली आहे. श्री गणेश चतुर्थीच्या पुर्वसंध्येला म्हणजेच १३ सप्टेंबरला कमाल तापमान २५.३ अंश सेल्सियस नोंदविले गेले होते, ते ३२ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले आहे. म्हणजेच १५ दिवसांत कमाल तापमानात सात अंश सेल्सियसपर्यंत वाढ झाली आहे. परिणामी नाशिककरांना सप्टेंबरमध्येच ऑक्टोबर हीटचा प्रत्यय येतो आहे. जून ते सप्टेंबर असा पावसाचा चार महिन्यांचा हंगाम असतो.

पावसाने जूनच्या सुरुवातीला नाशिककरांकडे पाठ फिरवली. त्यामुळे जूनमध्ये पाऊस सरासरी गाठू शकला नाही. जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये सरासरी गाठणारा पाऊस सप्टेंबरमध्ये गायब झाला आहे. म्हणजेच सरासरीच्या केवळ ३०.४ टक्के पाऊस पडला असून, तब्बल ६९.६ टक्के तूट नोंदविली जाणे चिंताजनक आहे. पुढील तीन - चार दिवस पावसाची चिन्हे नसल्याने सप्टेंबर महिना बऱ्यापैकी कोरडा जाण्याचे संकेत मिळत आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला केंद्राचा दिलासा; केंद्रीय पथक करणार पाहणी!

महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात; केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: राज्यातील दुष्काळी परिस्थितीची आता केंद्र सरकारनेही गंभीर दखल घेतली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान होत असताना महाराष्ट्रातील परिस्थितीचा जमीनीस्तरावर आढावा घेण्यासाठी केंद्रीय पथक पाठवण्यात येणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी स्वतः महाराष्ट्राचा दौरा करून परिस्थितीची पाहणी करणार असल्याचे सांगितले आहे.

त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्राकडून मदतीची अपेक्षा निर्माण झाली आहे. केंद्रीय कृषिमंत्र्यांनी २८ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय कृषी परिषदेत महाराष्ट्र आणि कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली. महाराष्ट्रातील जवळपास दोन-तृतीयांश भाग प्रभावित असल्याचे त्यांनी नमूद केले. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्राची टीम महाराष्ट्रात पाठवली जाणार असून, आपणही आपल्या टीमसह या राज्यांचा दौरा करणार असल्याचे चौहान यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील दुष्काळाची केंद्राकडून दखल राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागांमध्ये खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. सोयाबीन, कापूस यांसह विविध पिकांना पावसाच्या खंडाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. खरीप हंगामानंतर रब्बी हंगामाची तयारी करताना पाण्याची उपलब्धता हा मोठा प्रश्न ठरण्याची



शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्र्यांनीही आपल्या वक्तव्यात नमूद केली आहे.

राज्यातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्रावर दुष्काळाचा परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय पथक करणार जमीनीस्तरावर पाहणी दुष्काळाची तीव्रता, पिकांचे नुकसान, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा जमीनीस्तरावर आढावा घेण्यासाठी केंद्राचे पथक महाराष्ट्रात पाठवण्यात येणार आहे. या पाहणीतून राज्यातील वास्तविक परिस्थितीची माहिती केंद्र सरकारपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त राज्यांसाठी परिस्थितीनुसार उपाययोजना आणि मदतीबाबत आढावा घेतला जात असल्याचे चौहान यांनी स्पष्ट केले. मात्र, केंद्रीय पथकाच्या पाहणीनंतर कोणत्या स्वरूपाची आणि किती मदत मिळेल, हे संबंधित प्रक्रिया व नुकसानाच्या मूल्यांकनावर अवलंबून राहणार आहे. रब्बी हंगामासाठीही केंद्राचा सल्ला दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामाचे नियोजन करताना पाण्याची उपलब्धता आणि जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन पिकांची निवड करण्याचा सल्ला केंद्रीय कृषिमंत्र्यांनी दिला आहे. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे आणि पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रासह कमी पावसाचा सामना करणाऱ्या राज्यांमध्ये रेनफेड आणि सिंचन क्षेत्रासाठी स्वतंत्र नियोजन करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. उशिरा पेरणी केल्यास उगवण आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे उपलब्ध परिस्थितीनुसार वेळेत नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या मदतीकडे लक्ष दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडून होणाऱ्या पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, रब्बी हंगामाचे नियोजन आणि आर्थिक मदत या मुद्द्यांवर केंद्र व राज्य सरकारकडून ठोस उपाययोजना होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. केंद्रीय पथकाच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर महाराष्ट्रातील दुष्काळाची व्याप्ती आणि नुकसानाचे अधिक स्पष्ट चित्र समोर येईल.

राज्यात मतदारयाद्यांमध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिम

दुष्काळ सवलती आचारसंहितेच्या कचाट्यात; मतदारांचा अल्प प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

एरंडोल । प्रतिनिधी : राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी मोहिमेअंतर्गत (एसआयआर) ज्या मतदारांच्या नोंदणी मध्ये त्रुटी आढळल्या आहेत अशा मतदारांना सबंधित त्रुटी दूर करण्यासाठी येत्या शनिवार-रविवारी मतदान केंद्रात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांसाठी महाविद्यालयाच मतदार नोंदणी मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी प्रक्रियेत दावे व हरकती दाखल करण्याची मुदत १२ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे. तर प्राप्त नोटिसा, दावे व हरकती निकाली काढण्यासाठी १० नोव्हेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली असून, राज्याची अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.या मोहिमेत जुळणी न झालेले मतदार किंवा तार्किक विसंगती आढळून आलेल्या एक कोटी २२ लाख मतदांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मतदारांना आता मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे जाण्याची आवश्यकता नसून नोटीस आणि त्याचे उत्तर वॉट्सॲपवर पाठविण्याची मुभा देण्यात आली आहे. जुन्या मतदार यादीतील ज्या मतदारांचे नांव प्रारुप मतदार यादीत समिष्ट झालेले नाही अशा एक कोटी ५१ लाख मतदारांपैकी केवळ ३ लाख ९० हजार मतदारांनी गेल्या महिनाभरात नव्याने अर्ज दाखल केले असून यामध्ये नवमतदारांचाही समावेश आहे. नव्याने मतदार नोंदणीसाठी नागरिकांकडून मिळणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेऊन राज्यातील मतदारांसाठी येत्या



शनिवार- रविवारी मुंबईतील १० हजार मतदान केंद्रासह राज्यातील एक लाख ३०० मतदान केंद्रावर विशेष शिबिर आयोजित करण्यात आली आहेत. या ठिकाणी मतदारांना मतदार यादीतील आपले नांव, पत्ता यात सुधारणा करण्यासाठीचे अर्जही दाखल करता येतील. तसेच नवमतदार नोंदणीसाठी सर्व कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिबिर आयोजित करण्याचे आणि या शिबिराच्या माध्यमातून किती विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंद झाल्याचा तपशील सादर करण्याचे आदेशही राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.राज्यात विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागू झाली असतानाच राज्य सरकारने निवडणूक आयोगाची परवानगी न घेताच दुष्काळ जाहीर करुन आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप होत आहे. राज्य सरकारने शनिवारी २६५ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. या अंतर्गत विविध १२ प्रकारच्या सवलती जाहीर केल्या आहेत. याबाबतचा शासन निर्णय हा निर्णय निवडणूक आयोगाच्या मान्यतेशिवायच काढण्यात आल्याचे आता समोर आले आहे. दुष्काळ जाहीर करण्याबाबत आयोगाची परवानगी मागण्यासाठी सरकारने पाठविलेला प्रस्ताव आयोगाकडे प्रलंबित असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी मोहिमेअंतर्गत (एसआयआर) ज्या मतदारांच्या नोंदणी मध्ये त्रुटी आढळल्या आहेत अशा मतदारांना सबंधित त्रुटी दूर करण्यासाठी येत्या शनिवार- रविवारी मतदान केंद्रात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांसाठी महाविद्यालयाच मतदार नोंदणी मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी प्रक्रियेत दावे व हरकती दाखल करण्याची मुदत १२ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे. तर प्राप्त नोटिसा, दावे व हरकती निकाली काढण्यासाठी १० नोव्हेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली असून, राज्याची अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.या मोहिमेत जुळणी न झालेले मतदार किंवा तार्किक विसंगती आढळून आलेल्या एक कोटी २२ लाख मतदांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मतदारांना आता मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे जाण्याची आवश्यकता नसून नोटीस आणि त्याचे उत्तर वॉट्सॲपवर पाठविण्याची मुभा देण्यात आली आहे. जुन्या मतदार यादीतील ज्या मतदारांचे नांव प्रारुप मतदार यादीत समिष्ट झालेले नाही अशा एक कोटी ५१ लाख मतदारांपैकी केवळ ३ लाख ९० हजार मतदारांनी गेल्या महिनाभरात नव्याने अर्ज दाखल केले असून यामध्ये नवमतदारांचाही समावेश आहे. नव्याने मतदार नोंदणीसाठी नागरिकांकडून मिळणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेऊन राज्यातील मतदारांसाठी येत्या शनिवार- रविवारी मुंबईतील १० हजार मतदान केंद्रासह राज्यातील एक लाख ३०० मतदान केंद्रावर विशेष शिबिर आयोजित करण्यात आली आहेत. या ठिकाणी मतदारांना मतदार यादीतील आपले नांव, पत्ता यात सुधारणा करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये शिबिर आयोजित करण्याचे आणि या शिबिराच्या माध्यमातून किती विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंद झाल्याचा तपशील सादर करण्याचे आदेशही राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.राज्यात विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागू झाली असतानाच राज्य सरकारने निवडणूक आयोगाची परवानगी न घेताच दुष्काळ जाहीर करुन आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप होत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

उपवर्गीकरणाच्या विरोधात चर्मकार समाजाचा मोर्चात सहभागी होण्याचा संकल्प



जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून जळगावात चर्मकार समाजाची बैठक घेण्यात आली. यावेळी उपवर्गीकरणाच्या विरोधात भूमिका मांडत ४ ऑक्टोबर रोजी आयोजित महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा संकल्प करण्यात आला. बैठकीला चर्मकार समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षणाच्या मूळ उद्देशावर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका उपवर्गीकरण विरोधी लोक संघर्ष समितीचे संयोजक मुकुंद सपकाळे यांनी बैठकीत मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेत सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या क्षेत्रात संधी मिळण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली असल्याचे त्यांनी सांगितले.

"उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षणाच्या हक्कावर परिणाम होऊ नये," अशी भूमिका सपकाळे यांनी व्यक्त केली. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर समाजाने संघटितपणे आपली भूमिका मांडण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन दरम्यान, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांनी ४ ऑक्टोबर रोजी आयोजित महामोर्चात चर्मकार समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. उपवर्गीकरणाच्या विरोधात आयोजित करण्यात येणाऱ्या या महामोर्चाला समाजाच्या विविध भागांतून प्रतिसाद मिळावा, यासाठी बैठकीत उपस्थित समाजबांधवांशी चर्चा करण्यात आली. महामोर्चाच्या माध्यमातून आपली भूमिका शासनासमोर मांडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्राच्या सामाजिक कल्याण विभागाच्या अधिकृत माहितीनुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या यादीत एकूण ५९ जातींचा समावेश आहे. आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न हा या विविध अनुसूचित जातींमधील प्रतिनिधित्व आणि आरक्षणाच्या वाटपाशी संबंधित असल्याने त्यावर विविध सामाजिक संघटनांकडून भूमिका मांडल्या जात आहेत. बैठकीत समाजाच्या विविध प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर समाजाची भूमिका अधिक व्यापक पातळीवर मांडण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

गोवंश मांस विक्रीविरोधात कारवाई ८५ किलो मांसासह २१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त!

जन सम्राट टाईम्स



सावदा | प्रतिनिधी: सावदा पोलिसांनी रावेर तालुक्यातील लोहारा येथील गुल्ली लोहारा परिसरात बेकायदेशीररीत्या गोवंश जातीच्या जनावराचे मांस बाळगून विक्री केल्याच्या संशयावरून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ८५ किलो मांस, वजन काटा, सुरा, कुऱ्हाड आणि रोख रक्कम असा एकूण २१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. तर अन्य एक आरोपी पसार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. सावदा पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल मेहरबान तडवी यांच्या फिर्यादीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुप्त माहितीवरून छापा पोलिसांच्या माहितीनुसार, २८ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ६.२९ वाजता सावदा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राहुल सानप, सहायक पोलीस निरीक्षक गणेश फड आणि सहकाऱ्यांना लोहारा गावातील गुल्ली लोहारा भागात सुकी नदीकाठच्या एका घराच्या आडोशाला गोवंश मांस बाळगून त्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचांसह सकाळी सुमारे ६.५५ वाजता घटनास्थळी छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी पळून जाण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यापैकी एका संशयिताचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेण्यात आले, तर दुसरा संशयित झाडाझुडपांचा फायदा घेत पसार झाला. एकाला अटक; दुसरा फरार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव सलीमखा महेमुदखा कुरेशी (वय ६६, रा. कसाईवाडा, रसलपूर, ता. रावेर) असे आहे. तर अकीलखा सलीमखा कुरेशी (रा. रसलपूर, ता. रावेर) हा आरोपी फरार आहे. घटनास्थळाच्या मालकीसंदर्भात असलम शहादुर तडवी (रा. गुल्ली लोहारा, ता. रावेर) याचे नावही पोलिसांनी नमूद केले आहे. २१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त कारवाईदरम्यान पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केल्याचे सांगितले आहे— विविध कलमांन्वये गुन्हा दाखल याप्रकरणी सावदा पोलीस ठाण्यात FIR क्रमांक ०२४२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ (सुधारित २०१५) मधील कलम ५(ब), ५(क), ९, ९(अ) तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील कलम २७१, ३(५) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम १०५, ११७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. घटनास्थळावरून जप्त केलेल्या मांसाचे नमुने तपासणीसाठी सीलबंद करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अतुल तडवी करीत आहेत. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या सलीमखा महेमुदखा कुरेशी याला न्यायालयासमोर हजर केले.

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा!

सभासदांच्या सूचनांचीही घेण्यात आली दखल

जन सम्राट टाईम्स



धुळे। प्रतिनिधी: धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. सभेत बँकेच्या कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यातील काही विषयांना सभासदांची मंजुरी मिळाली, तर आयत्या वेळच्या विषयांवरही सभासदांनी आपली मते मांडली. सभेदरम्यान सभासदांनी बँकेच्या कामकाजासंदर्भात विविध सूचना मांडल्या. या सूचनांची दखल घेत संबंधित विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेला केवळ औपचारिक स्वरूप न राहता सभासदांच्या सहभागातून विविध विषयांवर विचारविनिमय झाला. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे होते. यावेळी बँकेचे सदस्य तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी, दीपक पाटील, शरद पाटील, किरण शिंदे यांच्यासह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी, अनिल शिसोदे, अनंत ठाकूर, सहदेवराव वारुडे तसेच बँकेचे संचालक, सभासद आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत मांडण्यात आलेल्या विविध विषयांवर चर्चा करताना सभासदांनी बँकेच्या कामकाजाशी संबंधित मुद्द्यांकडे लक्ष वेधले. तसेच आयत्या वेळच्या विषयांवरही सभासदांनी आपली मते मांडत सूचना केल्या. संबंधित सूचनांची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेमुळे बँकेच्या विविध विषयांवर संचालक मंडळ, अधिकारी आणि सभासद यांच्यात प्रत्यक्ष संवाद साधला गेला. धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. सभेत बँकेच्या कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यातील काही विषयांना सभासदांची मंजुरी मिळाली, तर आयत्या वेळच्या विषयांवरही सभासदांनी आपली मते मांडली. सभेदरम्यान सभासदांनी बँकेच्या कामकाजासंदर्भात विविध सूचना मांडल्या. या सूचनांची दखल घेत संबंधित विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेला केवळ औपचारिक स्वरूप न राहता सभासदांच्या सहभागातून विविध विषयांवर विचारविनिमय झाला. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे होते.

जिल्हा बँकेची थकबाकी ७७२६ कोटींवर; प्रशासकांकडून चिंता

जन सम्राट टाईम्स



अहिल्यानगर । प्रतिनिधी: जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला ६९ कोटींचा नफा झाला असला तरी यंदाच्या जूनअखेर कर्ज वसुली केवळ ४५ टक्के आहे. ३१ मार्च २०२६ अखेर ७७२६.२८ कोटींची थकबाकी निर्माण झाली आहे. पीक कर्जाची थकित रक्कम ३८४२.२१ कोटी आहे. वसुलीचे प्रमाण असेच कमी राहिले तर बँकेची आर्थिक स्थिती भविष्यात अडचणीची होईल असे स्पष्ट मत बँकेचे प्रशासक तथा विभागीय सहनिबंधक संगिता डोंगरे यांनी आज सोमवारी झालेल्या बँकेच्या वार्षिक सभेत व्यक्त केले. जिल्हा बँकेची ६९ वी वार्षिक सभा आज प्रशासक डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, माजी उपाध्यक्ष माधवराव कानवडे, माजी संचालक सीताराम गायकर, अंबादास पिसाळ, गिताजंली शेळके,महर्षी शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे आदी उपस्थित होते.

बँकेचे आर्थिक परिस्थिती विशेष करताना प्रशासक डोंगरे यांनी भागधारकांना १० टक्के प्रमाणे लाभांश देण्यासाठी ३९.०३ कोटी शिफारस केल्याचे सांगितले. ७७२६.२८ कोटी आहे. त्यात अल्प मुदत पीक कर्जे ३८४२.२१ कोटी, मध्यम मुदत कर्जे ९९६.६० कोटी, दिर्घ मुदत कर्जे १२७.१० कोटी तर साखर कारखाने व पगारदार पतसंस्था यांच्याकडे २७२४.८६ कोटी येणेबाकी आहे.

द्वारका नगर मित्र मंडळाचा 'पावनखिंड'चा

थरारक ऐतिहासिक देखावा

जन सम्राट टाईम्स



नशिराबाद| प्रतिनिधी: शौर्य, त्याग आणि स्वराज्यनिष्ठेचा प्रेरणादायी इतिहास सांगणाऱ्या 'पावनखिंड'च्या थरारक ऐतिहासिक प्रसंगाची आकर्षक प्रतिकृती नशिराबाद येथील द्वारका नगर मित्र मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आली आहे. द्वारका नगर, अण्णा नगर परिसरात उभारण्यात आलेला हा देखावा सध्या पंचक्रोशीत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असून, नागरिकांकडून मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे. शौर्यगाथेतून तरुणांना इतिहासाची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यरक्षणासाठी बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सैन्याने पावनखिंडीत दिलेल्या लढ्याची शौर्यगाथा महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण अध्याय मानली जाते.

याच इतिहासाची ओळख नव्या पिढीला व्हावी, शौर्य व त्यागाची प्रेरणा मिळावी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा तरुणांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने मंडळाने यंदा पावनखिंडीचा देखावा साकारला आहे. देखाव्यामध्ये ऐतिहासिक प्रसंगाचे विविध पैलू प्रभावीपणे मांडण्यात आल्याने तो पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. विशेषतः तरुणाईकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन हा देखावा साकारण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हेमंत दगडू तळेले, उपाध्यक्ष राहुल ज्ञानदेव चौधरी, खजिनदार दीपक जगदीश जाधव आणि सचिव ललित रवींद्र महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. देखाव्याची संकल्पना आणि उभारणीमध्ये मंडळातील सर्व सदस्यांनी सामूहिक सहभाग नोंदविला. तरुण कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम ऐतिहासिक देखावा प्रत्यक्षात साकारण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. यामध्ये ललित रवींद्र महाजन, कल्पेश प्रमोद पाटील, हिमांशू चौधरी, दीपक जगदीश जाधव, कमलेश पोपट नेहते, संजय नथ्थू नेहते, मनोज सुभाष पाटील, अक्षय कैलास महाजन, मोहित माळी, मयूर माळी, वेदांत पाटील, संदीप भागवत भोगे, परेश माळी यांच्यासह इतर तरुण कार्यकर्त्यांचे योगदान राहिले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक वातावरणासोबतच इतिहास, शौर्य आणि संस्कारांची ओळख करून देणारा देखावा उभारल्याने द्वारका नगर मित्र मंडळाच्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. पावनखिंडीचा इतिहास जाणून घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने देखाव्याला भेट देत आहेत.

पिके फेकत ठाकरे गटाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन!

५० हजारांची मदत जाहीर करण्याची मागणी; मागणी मान्य न झाल्यास बैलगाडी मोर्चाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : राज्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर झाल्यानंतर शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. यावेळी दुष्काळी अध्यादेशाची प्रत प्रतीकात्मकरीत्या जाळत तसेच शेतातील पिके कार्यालयासमोर फेकत शासनाच्या धोरणाचा निषेध करण्यात आला. आंदोलनादरम्यान शासनाच्या विरोधात घोषणाबाजीही करण्यात आली. शासनाने दुष्काळी परिस्थितीत विविध सवलती व उपाययोजना जाहीर केल्या असल्या तरी त्या शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुऱ्या असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांना तातडीने प्रतिएकरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख निंबा मराठे यांनी केली. मागणी मान्य न झाल्यास बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशाराही मराठे यांनी यावेळी दिला. पावसाच्या लहरीपणाचा शेतीला फटका धुळे जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांत यंदाच्या खरीप हंगामात



पावसातील तूट आणि पिकांच्या नुकसानीची परिस्थिती निर्माण झाल्याचे वृत्त आहे. शासनाने २६ सप्टेंबर रोजी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये Trigger-1 अंतर्गत दुष्काळी उपाययोजना लागू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या प्रमाणात थेट आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शासनाच्या सध्याच्या उपाययोजना शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी पुरेशा नसल्याचा दावा ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. पिके फेकून व्यक्त केला निषेध आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पिके फेकून तसेच दुष्काळी अध्यादेशाची प्रतीकात्मक होळी करून शासनाचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे वेधले. यावेळी 'शेतकऱ्यांना प्रतिएकरी ५० हजारांची मदत द्या' अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून प्रत्यक्ष नुकसानभरपाई देण्यासह दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक आर्थिक मदत मिळावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख निंबा मराठे, नरेंद्र परदेशी, महानगरप्रमुख तेजस गोटे, धीरज पाटील, कुणाल कानकाटे, प्रशांत भदाणे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांचा पुनर्विचार करून अधिक थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतरही तोलवापाडा विकासापासून दूर!

ग्रामस्थांनीच श्रमदानातून बनवला रस्ता! ४ किलोमीटर पक्क्या रस्त्यासाठी प्रशासनाला अल्टिमेटम

जन सम्राट टाईम्स

धडगाव। प्रतिनिधी: देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके उलटून गेल्यानंतरही अक्कलकुवा तालुक्यातील पिंपळखुंटा (तोलवापाडा) येथील ग्रामस्थांना मूलभूत रस्ते सुविधेसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने निर्माण झालेल्या अडचणींना कंटाळून ग्रामस्थांनी अखेर श्रमदानातून कच्चा रस्ता तयार करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाला जोडणारा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी खड्डे आणि चिखलामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संबंधित मार्ग क्रमांक ग्रामा-७९ असल्याचे सांगण्यात आले. पावसाळ्यात या मार्गाची अवस्था अधिक बिकट होत असल्याने गावाचा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण होते, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. शाळकरी मुलांपासून रुग्णांपर्यंत सर्वांचीच गैरसोय रस्त्याच्या दुरवस्थेचा सर्वाधिक फटका शाळकरी मुले, रुग्ण, गरोदर महिला आणि शेतकरी यांना बसत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. लहान मुलांना अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही वेळा रुग्णांना झोळीतून नेण्याची वेळ येते, अशी व्यथा ग्रामस्थांनी व्यक्त केली. पावसाळ्यात रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचेही



सांगण्यात आले. शेतकऱ्यांनाही शेतीमालाची वाहतूक करताना खराब रस्त्यामुळे आर्थिक तसेच शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'शासनाच्या योजना कागदावरच?' गावाच्या मूलभूत सुविधांकडे प्रशासनाचे पुरेसे लक्ष नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात रस्त्याचा प्रश्न कायम राहतो, अशी नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. वारंवार मागणी करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी स्वतः श्रमदानाचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रशासनाने आता या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. ४ किलोमीटर पक्का रस्ता आणि पुलाची मागणी पिंपळखुंटा-तोलवापाडा येथे सुमारे ४ किलोमीटर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करावे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी पुलांची उभारणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मागणी मान्य करून बारमाही वाहतुकीसाठी पक्का रस्ता उपलब्ध करून न दिल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या मागणीसाठी रोता हिमडा वसावे, विजय मोहना वसावे, नारसिंग मोहना वसावे, निमजी दामजा वसावे, गिम्ब्या ठोबड्या वसावे, धनजी हिमडा वसावे, मंगल वाहऱ्या वसावे, दशरथ कालशा वसावे, खुमानसिंग रोता वसावे, कालूसिंग दामजा वसावे, रमेश वसावे, कागडा रोता वसावे, खेमजी वसावे, दामज्या वळवी, वन्या वसावे, किसन वसावे, दिलीप वसावे, पिसा वसावे, ईश्वर वसावे यांच्यासह समस्त ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे. "पक्का रस्ता नसल्याने सुमारे ४५० ते ७०० ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णांना झोळीतून नेण्याची वेळ येते. वेळेवर उपचारासाठी पोहोचता न आल्याने गंभीर प्रसंग उद्भवल्याचेही ग्रामस्थ सांगतात. पावसाळ्यात रस्ता बंद झाल्याने मुलांच्या शाळेवरही परिणाम होतो. वारंवार मागणी करूनही प्रश्न सुटत नसल्याने ग्रामस्थांनी अखेर श्रमदानातून रस्ता बनवण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाने तातडीने गावाला वर्षभर वापरता येईल असा पक्का रस्ता उपलब्ध करून द्यावा." आता प्रशासन या मागणीची दखल घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही कधी सुरू करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके उलटून गेल्यानंतरही अक्कलकुवा तालुक्यातील पिंपळखुंटा (तोलवापाडा) येथील ग्रामस्थांना मूलभूत रस्ते सुविधेसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने निर्माण झालेल्या अडचणींना कंटाळून ग्रामस्थांनी अखेर श्रमदानातून कच्चा रस्ता तयार करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाला जोडणारा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी खड्डे आणि चिखलामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संबंधित मार्ग क्रमांक ग्रामा-७९ असल्याचे सांगण्यात आले. पावसाळ्यात या मार्गाची अवस्था अधिक बिकट होत असल्याने गावाचा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण होते, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. शाळकरी मुलांपासून रुग्णांपर्यंत सर्वांचीच गैरसोय रस्त्याच्या दुरवस्थेचा सर्वाधिक फटका शाळकरी मुले, रुग्ण, गरोदर महिला आणि शेतकरी यांना बसत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. लहान मुलांना अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने निर्माण झालेल्या अडचणींना कंटाळून ग्रामस्थांनी अखेर श्रमदानातून कच्चा रस्ता तयार करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाला जोडणारा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी खड्डे आणि चिखलामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संबंधित मार्ग क्रमांक ग्रामा-७९ असल्याचे सांगण्यात आले. पावसाळ्यात या मार्गाची अवस्था अधिक बिकट होत असल्याने गावाचा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण होते, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. शाळकरी मुलांपासून रुग्णांपर्यंत सर्वांचीच गैरसोय रस्त्याच्या दुरवस्थेचा सर्वाधिक फटका शाळकरी मुले, रुग्ण, गरोदर महिला आणि शेतकरी यांना बसत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. लहान मुलांना अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने निर्माण झालेल्या अडचणींना कंटाळून ग्रामस्थांनी अखेर श्रमदानातून कच्चा रस्ता तयार करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाला जोडणारा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी खड्डे आणि चिखलामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संबंधित मार्ग क्रमांक ग्रामा-७९ असल्याचे सांगण्यात आले. पावसाळ्यात या मार्गाची अवस्था अधिक बिकट होत असल्याने गावाचा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण होते, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. शाळकरी मुलांपासून रुग्णांपर्यंत सर्वांचीच गैरसोय रस्त्याच्या दुरवस्थेचा सर्वाधिक फटका शाळकरी मुले, रुग्ण, गरोदर महिला आणि शेतकरी यांना बसत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. लहान मुलांना अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही वेळा रुग्णांना झोळीतून नेण्याची वेळ येते, अशी व्यथा ग्रामस्थांनी व्यक्त केली. पावसाळ्यात रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचेही सांगण्यात आले. शेतकऱ्यांनाही शेतीमालाची वाहतूक करताना खराब रस्त्यामुळे आर्थिक तसेच शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पी.आर. हायस्कूलमध्ये माहिती अधिकार दिनानिमित्त विशेष व्याख्यान



जन सम्राट टाईम्स

धरणगाव| प्रतिनिधी धरणगाव येथील पी.आर. हायस्कूलमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या वर्धापन दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक तथा बालभारती अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बापू शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व आणि त्यामागील लोकशाही मूल्यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील होते. पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी तसेच शिक्षक नंदू पाटील यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बापू शिरसाठ म्हणाले, "माहितीचा अधिकार हा केवळ कायद्याच्या पुस्तकातील कायदा नसून सामान्य नागरिकाच्या हातातील लोकशाहीचे प्रभावी साधन आहे. या कायद्यामुळे नागरिकांना शासन आणि प्रशासनाला प्रश्न विचारण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला आहे." प्रश्न विचारण्याची वृत्ती ही लोकशाही व्यवस्थेतील जागरूक नागरिकत्वाचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात जबाबदार आणि सजग नागरिक म्हणून घडण्याचे आवाहन केले. "प्रश्न विचारणारा विद्यार्थी पुढे जागृत नागरिक बनतो," असे त्यांनी अधोरेखित केले. माहिती अधिकाराचा जनहितासाठी वापर करावा अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक डी. एस. पाटील यांनी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व अधोरेखित करताना कायद्याचा वापर जबाबदारीने आणि जनहितासाठी करण्याचे आवाहन केले. कायद्याचा गैरवापर होऊ नये, याचीही काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. सी. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय बेलदार यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.धरणगाव येथील पी.आर. हायस्कूलमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या वर्धापन दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक तथा बालभारती अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बापू शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व आणि त्यामागील लोकशाही मूल्यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील होते. पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी तसेच शिक्षक नंदू पाटील यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बापू शिरसाठ म्हणाले, "माहितीचा अधिकार हा केवळ कायद्याच्या पुस्तकातील कायदा नसून सामान्य नागरिकाच्या हातातील लोकशाहीचे प्रभावी साधन आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक ते प्राचार्य : संघशिल भद्रे सरांची ज्ञानयात्रा



कवीच्या संवेदनशील मनापासून संविधान अभ्यासकाच्या वैचारिक जाणिवेपर्यंत; शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, वक्तृत्व आणि सामाजिक कार्याचा अष्टपैलू प्रवास संघशिल चंद्रकला नवनाथ भद्रे

एखाद्या व्यक्तीची ओळख केवळ त्याच्या पदावरून होत नाही; तर त्याच्या विचारांनी, कार्याने आणि इतरांच्या आयुष्यात निर्माण केलेल्या सकारात्मक बदलातून त्याचे व्यक्तिमत्त्व घडत असते. शिक्षणाची आस, वाचनाची सवय, लेखणीची ताकद, विद्यार्थ्यांच्या भवितव्याची काळजी आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम म्हणजे प्राचार्य संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर यांचे व्यक्तिमत्त्व.

स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनातून असंख्य विद्यार्थ्यांशी जोडले गेलेले संघशिल भद्रे आज कोमलाबाई मुंडे नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यामुळे त्यांचा हा प्रवास केवळ एका पदापर्यंत पोहोचण्याचा प्रवास नसून, ज्ञान वाटत राहण्याच्या आणि पुढची पिढी घडविण्याच्या ध्यासाची वाटचाल आहे.

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना अभ्यासाची दिशा

स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ पुस्तकांचा अभ्यास नव्हे, तर नियोजन, सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य दिशेने केलेली मेहनत होय. हीच जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम संघशिल भद्रे यांनी सातत्याने केले.

पुणे, मुंबई, ठाणे तसेच नांदेड आणि परिसरातील विद्यार्थ्यांशी त्यांचा दीर्घकाळ संवाद राहिला आहे. यूपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक तसेच विविध सरळसेवा भरती परीक्षांसाठी त्यांनी मार्गदर्शन केले आहे. सामान्य ज्ञान, सामान्य अध्ययन, भारतीय राज्यव्यवस्था, भारतीय राज्यघटना आणि जीके-जीएस या विषयांबरोबरच परीक्षेचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, अभ्यासाची रणनीती आणि सातत्यपूर्ण तयारी यावर त्यांनी विशेष भर दिला.

त्यांच्या मार्गदर्शनाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ 'काय अभ्यासायचे?' एवढे सांगण्यापेक्षा 'अभ्यास कसा करायचा?' आणि 'आपल्या ध्येयाकडे कसे पाहायचे?' याची दृष्टी देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. म्हणूनच अनेक विद्यार्थ्यांसाठी ते केवळ शिक्षक न राहता मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्त्व बनले.

संविधानाच्या मूल्यांशी वैचारिक नाळ

संघशिल भद्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांशी असलेली त्यांची वैचारिक बांधिलकी.

'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ'चे नांदेड जिल्हा समन्वयक तथा

प्रसिद्धी व जनसंपर्क प्रमुख म्हणून ते सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहेत. संविधानिक मूल्यांचा प्रसार, सामाजिक समता, सांस्कृतिक जागृती आणि वैचारिक प्रबोधनाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे.

समाजातील प्रश्नांकडे केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेतून न पाहता, त्यांचा अभ्यास करून त्यावर विचार मांडणे आणि संवादातून जनजागृती करण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली आहे.

'विचारातून जागृती, कृतीतून परिवर्तन आणि संवादातून

प्रबोधन' ही त्यांच्या सामाजिक वाटचालीची दिशा म्हणता येईल. लेखणीला सामाजिक वास्तवाची धार कवी, लेखक आणि पत्रकार म्हणूनही संघशिल भद्रे यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कवी म्हणून त्यांच्या लेखणीत संवेदनशीलता आहे. लेखक म्हणून विषयाचा अभ्यास आहे. पत्रकार म्हणून सामाजिक वास्तवाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी आहे आणि वक्ते म्हणून विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता आहे.

शिक्षणक्षेत्रातील बदल, विद्यार्थ्यांचे प्रश्न, सामाजिक घडामोडी, संविधानिक जाणीवा आणि समाजजीवनातील विविध विषय त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. लेखणी ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती समाजाशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम असते. या भूमिकेतून त्यांनी लेखनाचा उपयोग वैचारिक प्रबोधनासाठी केला आहे. वक्तृत्वाच्या माध्यमातूनही त्यांनी विविध विचारमंचांवर संवाद साधला आहे. अभ्यास, विचार आणि प्रभावी मांडणी यांचा मेळ त्यांच्या वक्तृत्वात जाणवतो.

आता प्राचार्य म्हणून नवी जबाबदारी

कोमलाबाई मुंडे नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारणे हा संघशिल भद्रे यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी असलेला दीर्घकाळचा संवाद आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव आता संस्थात्मक जबाबदारीत रूपांतरित झाला आहे. प्राचार्य म्हणून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास, प्रात्यक्षिक कौशल्ये आणि करिअरविषयक जाणीव यांना चालना देणे, हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरू शकते.

विशेषतः नर्सिंगसारख्या सेवाभिमुख अभ्यासक्रमात

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसते. ज्ञानासोबत शिस्त, संवेदनशीलता, जबाबदारी, सेवाभाव आणि मानवी दृष्टिकोन विकसित करणेही आवश्यक असते. या दिशेने विद्यार्थ्यांना घडविण्याची संधी त्यांना या नव्या भूमिकेत मिळाली आहे.

जडणघडणीत कुटुंब आणि मार्गदर्शकांचे योगदान

कोणत्याही व्यक्तीच्या यशामागे त्याच्या स्वतःच्या मेहनतीसोबत कुटुंबीयांचे संस्कार आणि मार्गदर्शकांचे योगदानही महत्त्वाचे असते. संघशिल भद्रे यांच्या जडणघडणीत वडील ॲड. नवनाथजी भद्रे, चुलते प्रा. पी. जी. भद्रे, आई ग्रामसखी अनुलोम जनसेविका चंद्रकला भद्रे जामखेडकर, मामा ॲड. रणजित जामखेडकर, रोजगारसेवक रघुनाथ जोंधळे आणि प्रा. उत्तम नरसीकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य मोलाचे ठरले आहे.

कुटुंबातून मिळालेले संस्कार,

मार्गदर्शकांकडून मिळालेली दिशा आणि स्वतःची अभ्यासू वृत्ती यांच्या संगमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली आहे.

पद बदलले; पण ध्येय तेच

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना सरकारी सेवेकडे जाण्याचा मार्ग दाखविणे असो, पत्रकार म्हणून सामाजिक प्रश्न मांडणे असो, कवी म्हणून संवेदना व्यक्त करणे असो किंवा आता प्राचार्य म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीची जबाबदारी स्वीकारणे असो—या सर्व भूमिकांमागे एक समान धागा दिसतो. तो म्हणजे ज्ञानाची देवाणघेवाण आणि समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची इच्छा.

पद बदलले, जबाबदारी बदलली; मात्र विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची आणि त्यांना पुढे नेण्याची भूमिका कायम राहिली आहे.

ज्ञानाची वाट दाखवून, स्वप्नांना देतात भरारी; लेखणी, विचार, शिक्षणातून घडवितात नवी पिढी सारी.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक ते प्राचार्य, कार्याची वाटचाल प्रेरणादायी महान; संघशिल सरांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छांचा मान!

नव्या पर्वासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

वाढदिवस हा केवळ एका व्यक्तीच्या जन्मदिवसाचा उत्सव नसतो; तो आतापर्यंतच्या प्रवासाकडे पाहण्याचा आणि भविष्यातील वाटचालीसाठी नव्या संकल्पांची सुरुवात करण्याचा दिवस असतो. संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सरांच्या आयुष्यातील आजचा दिवस अशाच नव्या पर्वाची सुरुवात करणारा ठरावा, हीच सदिच्छा. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांशी निर्माण झालेले नाते, लेखणीच्या माध्यमातून व्यक्त झालेले विचार, वक्तृत्वातून साधलेला संवाद, सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान आणि आता प्राचार्य म्हणून स्वीकारलेली शैक्षणिक जबाबदारी—या सर्वांचा संगम म्हणजे त्यांची अष्टपैलू वाटचाल. अभ्यासू वृत्ती, संवेदनशील मन, लेखणीची ताकद, विद्यार्थ्यांशी असलेला सुसंवाद आणि सामाजिक विषयांशी असलेली बांधिलकी यांच्या बळावर त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त नव्या जबाबदारीतून विद्यार्थ्यांच्या विकासाला अधिक व्यापक दिशा मिळो, शैक्षणिक क्षेत्रात विधायक उपक्रमांची नवी पर्वणी सुरू होवो, ज्ञान आणि विचारांची ज्योत अधिक दूरवर पोहोचो आणि शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याला नवी उंची लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

प्राचार्य संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सरांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

लेखक :
रत्नदीप कांबळे – ग्राम महसूल अधिकारी, ठाणे
इंजि. जयपाल शिरसाठे – नाशिक

अक्राणी तालुक्यातील 7 'कोतवाल' पदांसाठी उद्या आरक्षण सोडत!

दुपारी २ वाजता चिठ्ठ्या टाकून प्रक्रिया; सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह नागरिकांना उपस्थितीचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

धडगाव। प्रतिनिधी: अक्राणी तालुक्यातील विविध महसूल सजेअंतर्गत रिक्त असलेल्या महसूल सेवक (कोतवाल) पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला असून, सात रिक्त पदांसाठी समांतर अर्थात महिला आरक्षण निश्चित करण्याकरिता बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. चिठ्ठ्या टाकून पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती शहादा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी दिपक पदमसिंग गिरासे यांनी जाहीरनाम्याद्वारे दिली आहे. नाशिक विभागाच्या सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्याकडून अक्राणी तालुक्यातील कोतवाल संवर्गाची बिंदू नामावली मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा अंतर्गत) रिक्त असलेली एकूण ७ पदे १०० टक्के सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. शासनाच्या प्रचलित तरतुदीनुसार या सात पदांपैकी पाच पदे सर्वसाधारण प्रवर्गासाठी आणि दोन पदे महिलांसाठी (३० टक्के आरक्षण) निश्चित करावयाची आहेत. मात्र, हे महिला आरक्षण कोणत्या महसूल सजेतील पदांसाठी राहणार, हे सोडतीद्वारे निश्चित केले जाणार आहे. तहसील कार्यालयात होणार सोडत ही आरक्षण सोडत बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालय सभागृह, अक्राणी (धडगाव) येथे



आयोजित करण्यात आली आहे. चिठ्ठ्या टाकून आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या सात महसूल सजेचा समावेश १. बोरवण सजा : बोरवण, खरवड, चाँदवाडे बु., चोंदवाडे खु., अंबारी, बिलबारपाडा. २. तोरणमाळ सजा : जुने तोरणमाळ, नवे तोरणमाळ, केलापाणी, झापी, कुंड्या, भादल, उडद्या. ३. गोरंबा सजा : गोरंबा, वेलखेडी, जुगाणी, मोडलगाव. ४. खुंटामोडी सजा : खुंटामोडी, कुंडल, खांडबारा, मोजरा, कात्री रे., कात्री फॉ., माकडकुंड, पौला. ५. रोषमाळ बु. सजा : रोषमाळ बु., वडफळ्या, जुने धडगाव, हरणखुरी, भुजगाव. ६. खर्डा सजा : खर्डा, हातधुई, वरखेडी बु., वरखेडी खु., टेंबला. ७. दुट्टल सजा : दुट्टल, चिंचखेडी, नळगव्हाण, बोरसिसा, निमगव्हाण, सुरुंग. गावपातळीवर प्रसिद्धीचे निर्देश आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी संबंधित गावांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी दिपक पदमसिंग गिरासे यांनी केले आहे. सोडतीची माहिती गावपातळीवर नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दवंडी देणे तसेच ग्रामपंचायत आणि चावडीच्या सूचना फलकावर प्रसिद्धी करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी, संबंधित मंडळ अधिकारी आणि ग्रामसेवकांना देण्यात आले आहेत. अक्राणी तालुक्यातील या सात महसूल सजेतील कोतवाल पदांच्या भरतीपूर्वी होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे संबंधित गावांचे आणि इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे. अक्राणी तालुक्यातील विविध महसूल सजेअंतर्गत रिक्त असलेल्या महसूल सेवक (कोतवाल) पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला असून, सात रिक्त पदांसाठी समांतर अर्थात महिला आरक्षण निश्चित करण्याकरिता बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. चिठ्ठ्या टाकून पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती शहादा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी दिपक पदमसिंग गिरासे यांनी जाहीरनाम्याद्वारे दिली आहे.

दापोरा येथे राहत्या घरात महिलेचा गळफास घेऊन मृत्यू!

जन सम्राट टाईम्स



दापोरा। प्रतिनिधी: येथील रहिवासी सुनीताबाई विश्वनाथ वाणी (वय ५९) यांचा राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी सुमारे ११ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी याबाबत पोलिसांना कळविले. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, सुनीताबाई वाणी यांनी हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणातून उचलले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही. पोलिसांकडून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रविण पाटील करीत आहेत. विश्वनाथ वाणी (वय ५९) यांचा राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी सुमारे ११ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी याबाबत पोलिसांना कळविले. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, सुनीताबाई वाणी यांनी हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणातून उचलले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही. पोलिसांकडून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रविण पाटील करीत आहेत.

राष्ट्रीय एकात्मता ही लोकशाहीची महत्त्वाची शक्ती : प्रा. राजेंद्र वाघुळदे

भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मतेवर एकदिवसीय कार्यशाळा; १३० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: "आपल्या देशातील राष्ट्रीय एकात्मता हा लोकशाहीचा महत्त्वाचा घटक आहे. जात, धर्म आणि पंथ यांना एकत्र गुंफून ठेवण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता ही महत्त्वाची शक्ती आहे," असे प्रतिपादन धनाजी नाना चौधरी महाविद्यालय, फैजपूरचे प्राचार्य प्रा. राजेंद्र वाघुळदे यांनी केले. सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्राचार्य प्रा. राजेंद्र वाघुळदे, प्राचार्य प्रा. डॉ. संजय भोळे, प्राचार्य प्रा. किशोर कोल्हे, प्रा. डॉ. दिनेश पाटील आणि कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. सुनील नेवे उपस्थित होते. राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, विविधतेतील एकता, संविधानिक मूल्ये आणि राष्ट्रीय जबाबदारी याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. कार्यशाळेत भालोद, फैजपूर आणि ऐनपूर येथील महाविद्यालयांमधील सुमारे १३० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. उद्घाटन सत्रात प्राचार्य प्रा. राजेंद्र वाघुळदे यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर दुसऱ्या सत्रात शेंदुर्णी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. संजय भोळे यांनी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्यासाठी भारतीय संविधानाचे वाचन आणि संविधानिक मूल्यांची जाणीव आवश्यक असल्याचे सांगितले. "राष्ट्रीय एकात्मता ही काळाची गरज असून जात, धर्म आणि पंथ यांना जोडण्याची ताकद युवकांमध्ये आहे," असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित दोन भावनिक कविता सादर केल्या. कीर्तनातून सामाजिक प्रबोधनाचा संदेश तिसऱ्या सत्रात भुसावळ येथील कीर्तनकार दीपक पाटील महाराज यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन घडते, त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होतो, असे त्यांनी सांगितले. तसेच व्यसनाधीनता हा गंभीर सामाजिक प्रश्न असून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. समारोप सत्रात पु. ओ. नाहाटा महाविद्यालय, भुसावळचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. एस. नाडेकर यांनी मार्गदर्शन केले. अशा कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराबद्दल सत्कार यावेळी धनाजी नाना चौधरी महाविद्यालय, फैजपूरचे प्राचार्य प्रा. राजेंद्र वाघुळदे आणि शेंदुर्णी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. संजय भोळे यांना महाराष्ट्र शासनातर्फे 'उत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार मिळाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. किशोर कोल्हे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यशाळेत सहभागी झालेल्या कोमल तायडे (भालोद महाविद्यालय), श्वेता भालेराव (फैजपूर महाविद्यालय) आणि सोपान गवळे (भालोद महाविद्यालय) यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोख्याशी संबंधित मूल्यांची अधिक स्पष्ट जाणीव झाल्याचे त्यांनी सांगितले. सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सुनील नेवे यांनी प्रास्ताविक तसेच समारोप सत्राचे सूत्रसंचालन केले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. मोहिनी तायडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मीनाक्षी वाघुळदे यांनी केले. समारोप समारंभाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य प्रा. किशोर कोल्हे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक डॉ. दिनेश पाटील, कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. सुनील नेवे, प्रा. डॉ. जतिनकुमार मेढे, प्रा. डॉ. पद्माकर सावळे, प्रा. डॉ. मीनाक्षी वाघुळदे, प्रा. मोहिनी तायडे, प्रा. वसंतराव पवार, प्रा. हेमंत इंगळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यशाळेला प्रा. डॉ. अजयकुमार कोल्हे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रा. काशिनाथ पाटील, प्रा. डॉ. गणेश चौधरी, प्रा. डॉ. राकेश चौधरी, प्रा. डॉ. आशुतोष वर्डीकर, प्रा. डॉ. दिनेश महाजन, प्रा. निलेश पाटील, प्रा. गीतांजली चौधरी, प्रा. हंसिका महाजन, प्रा. फाल्गुनी महाजन, प्रा. जान्हवी परतणे, प्रा. मानसी महाजन, प्रा. भावना प्रजापती, प्रा. कोमल सावळे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

अहिल्यानगर जिल्हा बँकेसाठी विश्वासार्ह संचालक हवेत!

जन सम्राट टाईम्स



अहिल्यानगर | प्रतिनिधी: दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी काल, रविवारी बैठक झाली. मात्र दुष्काळी परिस्थिती पाहून निवडणुकीत आपला स्वतःचा 'अजेंडा' कोणी राबवत असेल तर ते गैर आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला जावा, बँकेचे हित जोपासले जावे, यासाठी विश्वासार्ह सांचालक मंडळ बँकेवर असावे, अशी अपेक्षा भाजप नेते तथा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी व्यक्त केली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पुढाकार घेणारे सर्वांशी संवाद साधून योग्य निर्णय घेतील. त्यासाठी त्यांनी सर्वांची सहमती मिळवणे आवश्यक आहे, अशी अपेक्षाही सभापती राम शिंदे यांनी व्यक्त केली आहे.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पुढाकार घेणारे सर्वांशी संवाद साधून योग्य निर्णय घेतील. त्यासाठी त्यांनी सर्वांची सहमती मिळवणे आवश्यक आहे, अशी अपेक्षाही सभापती राम शिंदे यांनी व्यक्त केली आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आज, सोमवारपासून अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अनेक नेत्यांनी संगमनेरमध्ये बैठक घेऊन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी प्राथमिक बैठक घेतली.या बैठकीच्या पार्श्वभूमीवर सभापती शिंदे बोलत होते.सभापती शिंदे म्हणाले, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आपली सक्रिय भूमिका राहील, असे आपण पूर्वीच जाहीर केले होते. त्या दृष्टीने कर्जत व जामखेड तालुक्यातून माझ्या नावाचा ठरावही करण्यात आला. मी जरी वरिष्ठ पदावर असलो तरी बँकेमध्ये वरिष्ठ असणाऱ्यांचे सहकार्य मिळवण्यासाठी गाठीभेटी घेतल्या. सहकाराच्या निवडणुकीत प्राप्त परिस्थितीत सर्वांना बरोबर घेऊन जावे लागणार आहे. काल, संगमनेरमध्ये झालेल्या बैठकीसाठी मला निरोप देण्यात आला होता. परंतु या बैठकीचा 'अजेंडा' काय होता याची आपल्याला कल्पना नव्हती. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळवणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक बिनविरोध व्हावी असे सुतवाच केले आहे. देशात आणि राज्यात दुष्काळाचे सावट आहे. माझी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काल बैठक घेऊन एक पाऊल पुढे टाकले आहे. मात्र दुष्काळाचे कारण सांगून आपला स्वतःचा 'अजेंडा' कोणी राबवू नये, अशी ही अपेक्षा सभापती शिंदे यांनी व्यक्त केली.राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी माझ्यामुळे राम शिंदे यांना सभापती पद मिळाले अशी, टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना राम शिंदे म्हणाले अशा शिफारसीने कोणी नियुक्त झाले असते तर त्यांच्याकडे रांगा लागल्या असत्या.

गाढोदे येथे वर्षावास प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प संपन्न

बुद्धांचे आरोग्यशास्त्र' विषयावर डॉ. प्रा. सचिन नरवाडे यांचे मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स



जळगाव । प्रतिनिधी: येथे भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प उत्साहपूर्ण आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. यावेळी आयु. डॉ. प्रा. सचिन नरवाडे (आयुर्वेद तज्ज्ञ तथा जिल्हा संरक्षण सचिव, जळगाव) यांनी 'तथागत गौतम बुद्धांचे आरोग्यशास्त्र' या विषयावर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनातील साधी-सोपी उदाहरणे देत त्यांनी आरोग्य, आहार, जीवनशैली आणि निरोगी जीवन जगण्यासंदर्भातील विविध पैलू उपस्थितांना समजावून सांगितले. सहज, सोप्या आणि सर्वांना समजेल अशा भाषेत केलेल्या मार्गदर्शनाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास आयु. नी ज्योतिताई भालेराव (केंद्रीय शिक्षिका, जळगाव), आद. मीराबाई मा. नरवाडे, आद. वंदनाताई भिसे, आद. गौतम सपकाळे (बौद्धाचार्य), आद. आधारअण्णा सपकाळे (माजी श्रामणेर), आद. समिंदर सपकाळे (माजी श्रामणेर), आद. संतोष सपकाळे (माजी श्रामणेर), आद. हिरामण लटकन सपकाळे, आद. मधुकर भवानी सपकाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच गाढोदे महिला ग्राम शाखेच्या अध्यक्षा आद. कविताताई सपकाळे यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणी, परिसरातील श्रद्धाशील बौद्ध उपासक-उपासिका तसेच बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. राजेश इंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयु. गौतम सपकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. वर्षावास प्रवचन मालिकेच्या माध्यमातून धम्मविचार, आरोग्यदृष्टी आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश पोहोचत असल्याने परिसरातील उपासक-उपासिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. येथे भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प उत्साहपूर्ण आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. यावेळी आयु. डॉ. प्रा. सचिन नरवाडेयांनी 'तथागत गौतम बुद्धांचे आरोग्यशास्त्र' या विषयावर मार्गदर्शन केले.

पाटखेडा येथे रस्त्यावर घाणीचे साम्राज्य; नागरिकांची ये-जा अडचणीत

जन सम्राट टाईम्स



जामनेर । (प्रतिनिधी): जामनेर तालुक्यातील पाटखेडा गावातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा व घाण साचल्याने नागरिकांच्या दैनंदिन ये-जा करण्यावर परिणाम होत आहे. रस्त्याच्या दुतर्फा अस्वच्छता पसरल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील रस्त्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, अस्वच्छ वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

विशेषतः पावसाळ्यात साचलेल्या कचऱ्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. रस्त्यालगत साचलेली घाण, कचरा आणि अस्वच्छतेमुळे पादचारी तसेच वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावातील सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना कराव्यात पाटखेडा ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने गावातील रस्त्यांची स्वच्छता करून साचलेला कचरा हटवावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच केवळ एकदाच स्वच्छता न करता नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाब असल्याने प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्वच्छता मोहीम राबवावी आणि गावातील रस्ते स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

लासूर येथे २८ सप्टेंबरपासून संगीतमय शिव महापुराण कथा पातळेश्वर महादेव मंदिरात सात दिवसांचा धार्मिक ज्ञानयज्ञ;

जन सम्राट टाईम्स

चोपडा। प्रतिनिधी: लासूर (ता. चोपडा, जि. जळगाव) येथील इंदिरानगर परिसरातील पातळेश्वर महादेव मंदिर येथे संगीतमय शिव महापुराण कथा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ पासून या धार्मिक सोहळ्याला प्रारंभ होणार असून रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी शिव महापुराण कथेची सांगता होणार आहे. या कालावधीत दररोज रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

संतकृपा वारकरी शिक्षण संस्था, कांचनपूरचे अध्यक्ष ह.भ.प. दिनेशजी महाराज कांचनपूरकर हे कथाकार म्हणून उपस्थित राहून शिव महापुराणातील विविध प्रसंगांचे निरूपण करणार आहेत. त्यांच्या रसाळ वाणीतून भाविकांना शिवमहापुराणातील आध्यात्मिक आणि धार्मिक विचारांचे श्रवण करता येणार आहे. ५ ऑक्टोबरला काल्याचे कीर्तन व महाप्रसाद शिव महापुराण कथा सांगतेनंतर सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत ह.भ.प. दिनेशजी महाराज कांचनपूरकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सात दिवस मास-मच्छी विक्री बंद; गावाच्या एकोप्याची चर्चा शिव महापुराणाच्या निमित्ताने लासूर गावात सात दिवस मास-मच्छी विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामस्थांनी एकत्रितपणे घेतलेला हा निर्णय गावातील सामाजिक सहभाग आणि परस्पर सहकार्याचे उदाहरण म्हणून चर्चेत आहे. या काळात विविध समाजघटकांकडून कार्यक्रमाला सहकार्य मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले. समितीचे नियोजन; ग्रामस्थांचे सहकार्य शिव महापुराण कथा समितीचे अध्यक्ष समाधान कोळी (आबा), उपाध्यक्ष रावसाहेब सोनगिरे, सचिव सुरेश महाजन, सहसचिव नंदू भाऊसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. समितीचे सदस्य भालचंद्र पाटील, देविदास माळी, विनोद माळी, भगवान माळी, योगराज माळी, सुरेश पाटील, रवींद्र कोळी, राहुल कोळी, पप्पू पाटील, महेंद्र माळी, राहुल माळी, पिंटू माळी, सचिन माळी, मनोहर धोबी यांच्यासह पातळेश्वर महादेव मंदिर समिती आणि समस्त ग्रामस्थ लासूर यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभत आहे.

आठ महिन्यांनंतर धुळे मनपाला विरोधी पक्षनेता; दीपक खोपडे यांची नियुक्ती

महापौर परदेशी यांच्याकडून नियुक्तीपत्र; विकासकामांना सहकार्य, चुकीच्या कामांना विरोध करण्याची भूमिका

जन सम्राट टाईम्स



धुळे । प्रतिनिधी: धुळे महानगरपालिकेतील प्रलंबित विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा अखेर सुटला असून शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसप्रणीत शहर विकास आघाडीचे नगरसेवक बंटी उर्फ दीपक खोपडे यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महापौर मायादेवी परदेशी यांनी खोपडे यांना नियुक्तीपत्र दिल्यानंतर त्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला. महापालिका निवडणुकीनंतर सुमारे आठ महिन्यांपासून विरोधी पक्षनेतेपद रिक्त होते. या पदासाठी शहर विकास आघाडी आणि एमआयएमकडून दावे करण्यात आले होते. सप्टेंबरच्या सुरुवातीला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने विरोधी पक्षनेतेपदाबाबत चार आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश संबंधित प्राधिकरणाला दिल्याची माहिती समोर आली होती. शहर विकास आघाडीने महापालिकेतील १३ नगरसेवकांच्या संख्याबळाचा आधार घेत दीपक खोपडे यांच्या नियुक्तीची मागणी केली होती. ५ सप्टेंबर रोजी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महापौरांकडे याबाबत भूमिका मांडली होती. 'विकासकामांना सहकार्य, चुकीच्या कामांना विरोध' नवनियुक्त विरोधी पक्षनेते बंटी खोपडे यांनी सर्व पक्षांच्या नगरसेवकांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली. "शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना सहकार्य केले जाईल; मात्र चुकीच्या कामांना विरोध केला जाईल," असे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षनेतेपदाची नियुक्ती झाल्यानंतर समर्थकांनी गुलालाची उधळण करत तसेच फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. आठ महिन्यांपासून सुरू होती रस्सीखेच धुळे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक जानेवारी २०२६ मध्ये झाली. त्यानंतर विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर विकास आघाडी आणि एमआयएममध्ये दावेदारी सुरू झाली होती. उपलब्ध वृत्तांनुसार एमआयएमनेही या पदावर दावा करत न्यायालयीन मार्गाचा अवलंब केला होता. न्यायालयीन निर्देशानंतर दोन्ही गटांकडून महापौरांकडे आपापल्या दाव्यांच्या समर्थनार्थ पत्रव्यवहार करण्यात आला. त्यानंतर महापौर मायादेवी परदेशी यांनी शहर विकास आघाडीचे नगरसेवक दीपक खोपडे यांना विरोधी पक्षनेतेपदाचे नियुक्तीपत्र दिले. धुळे महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील नगरसेवकांच्या यादीतही खोपडे दिपक (बंटीभाऊ) सुरेश यांची नोंद प्रभाग १६-डमधील नगरसेवक म्हणून आहे. पदाधिकाऱ्यांची उपस्थिती खोपडे यांच्या नियुक्तीनंतर झालेल्या जल्लोषप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. तुळशीराम गावित, शहर विकास आघाडीचे गटनेते तथा नगरसेवक शहाबाज शहा, शिवसेनेचे महानगरप्रमुख संजय वाल्हे, तुषार नवले, नगरसेवक डॉ. सर्फराज अन्सारी, नगरसेविका मंगला सोनवणे यांच्यासह शहर विकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धुळे महानगरपालिकेतील प्रलंबित विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा अखेर सुटला असून शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसप्रणीत शहर विकास आघाडीचे नगरसेवक बंटी उर्फ दीपक खोपडे यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महापौर मायादेवी परदेशी यांनी खोपडे यांना नियुक्तीपत्र दिल्यानंतर त्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला. महापालिका निवडणुकीनंतर सुमारे आठ महिन्यांपासून विरोधी पक्षनेतेपद रिक्त होते. या पदासाठी शहर विकास आघाडी आणि एमआयएमकडून दावे करण्यात आले होते.

गट-ब आणि स्थापत्य अभियांत्रिकी परीक्षा पुढे ढकलल्या

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होणारी राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ सह इतर महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन आणि विविध संघटनांनी केलेल्या मागण्यांचा विचार करून आयोगाने हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे.राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मधील गुण आणि मूल्यांकनाबाबत अनेक विद्यार्थी, विद्यार्थी संघटनांनी आयोगाकडे तीव्र आक्षेप नोंदवले होते. विद्यार्थ्यांचे हित आणि पारदर्शकता विचारात घेऊन आयोगाने २०२५ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सर्व उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. या पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण निकाल आणि पुढील प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दुसरीकडे, राज्यातील परीक्षा पद्धतींमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. या समितीने राज्यभरातील परीक्षार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून उत्तम परीक्षा पद्धतीचा अभ्यास केला आहे. या समितीचा अहवाल आणि आदर्श परीक्षा पद्धतीबाबतच्या शिफारशी लवकरच शासनाला प्राप्त होणार आहेत.३ ऑक्टोबर २०२६ पासून नियोजित असलेली राज्यसेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, यासाठी लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, पालक आणि विविध विद्यार्थी संघटनांनी आयोगाला निवेदने दिली होती. साकल्याने विचार करून आयोगाने खालील प्रमुख मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे: